# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.०२/०९/२०१८

## दि.०१/०९/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ३८६/१८,भादविक ३०६,५०६ ,३५४(ड) |
| **फिर्यादी** | प्रकाश कोळेश्वर,वय-५४,रा चक्रधर नगर तरोडा खुर्द नांदेड |
| **आरोपी** | मयुल,रा.अकोला बायपास,हिंगोली (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०८/२०१८ ते दि.१७/०८/२०१८ रोजी १३/३० वा.चे दरम्यान सुरभी अपार्ट. हिंगणे-खुर्द व कोथरुड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची मुलगी प्रतिक्षा प्रकाश कोळेश्वर,वय-१९,रा.एकता कॉलनी,कोथरुड,पुणे व यातील नमुद इसम मयुल हे एकमेकांचे ओळखीचे असुन,सदर इसमाने तीचेबरोबर ओळख वाढवुन,तीचे फोटो घरातील लोकांना दाखवुन,तीचे नातेवाईकांना जीवे मारण्याची धमकी देवुन,तीस वांरवार फोन करून,व्हॉटसअपवर मॅसेज करुन,तीला भेटाला आल्यावर तीचेबरोबर वारंवार वाद करुन,तीचा शारिरकीक व मानसिक छळ करुन,प्रतिक्षा हिस तीचे राहते घरी गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. गडकरी ९७६३८९०२२३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ३९५/१८,भादविक ३०६,३४ |
| **फिर्यादी** | शरीफ मेहबुब शेख,वय-२१,रा.हिरवी चाळ,जनवाडी,पुणे |
| **आरोपी** | एकुण सात इसम व महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/०८/२०१८ रोजी १५/३० वा.घर नं.५२,हिरवी चाळ,जनवाडी,पुणे येथे फिर्यादीचे राहते घरी |
| **तपशिल** | यातील नमुद इसम व महिला हे फिर्यादी यांचे भाऊ अफजल मेहबुब शेख,वय-२९,रा.घर नं. ५२,हिरवी चाळ,जनवाडी,पुणे हे अफजल शेख याचे पत्नीकडुन नातेवाईक आहेत. अफजल याचे पत्नीने काही दिवसापुर्वी आत्महत्या केली आहे. सदर बाबत चतुःश्रृंगी पोस्टे गुरनं २२३/१८,भादविक ३०६,४९८(अ),३०४(ब),३४ अन्वये दाखल आहे. सदरचा गुन्हा दाखल करण्यापुर्वी व गुन्हा दाखल केल्यानंतर सदर इसम व महिला यांनी अफजल शेख यास वारंवार ५० लाख रूपये केस मिटवण्यासाठी दे,नाहीतर तुला व तुझ्या नातेवाईकांना पुन्हा गुन्हयात अडकवुन टाकु असे सांगुन,त्याचा मानसिक छळ करुन,दि.२९/०८/२०१८ रोजी १५/३० वा.चे सुमारास अफजल शेख यास त्याचे घरातील छताला साडीचे सहायाने गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ए.आर.शिंदे ९७६४५१६५५० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ३९३/१८,भादविक ४२०,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३२ वर्षे,रा.भोसलेनगर,पुणे |
| **आरोपी** | दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०३/२०१८ रोजी दुपारी १२/१५ वा. परिहार चौक,औंध,पुणे व एरंडवणा,कोथरूड,पुणे तसेच ओंकारेश्वर मंदीर,नारायण पेठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद दोन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांचे मुलास पाषाण,पुणे येथील शाळेमध्ये इयत्ता पहिली मध्ये प्रवेश करून देतो असे सांगुन,फिर्यादी यांचेकडुन वेळावेळी एकुण ४,००,०००/- रूपये रोख रक्कम व फिर्यादी यांचे मुलाची कागदपत्रे घेवुन,फिर्यादी यांचे मुलास प्रवेश मिळवुन न देता त्यांची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. अनुराधा भोसले ८३०८०३५०४८ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ५०३/१८,भादविक १७०,४२० |
| **फिर्यादी** | भुषणलाल फोतेदार,वय-६२,रा.एन.आय.बी.एम.रोड,पुणे |
| **आरोपी** | अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०९/२०१८ रोजी १०/४५ वा. आनंदपुर चॅरीटेबल हॉस्पी जवळ,एन.आय.बी.एम.रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे आनंदपुर हॉस्पीटल एन.आय.बी.एम.रोड,पुणे येथे त्यांचे आईवर उपचार करण्यासाठी नमुद ठिकाणी हॉस्पीटलचे गेट जवळ थांबल्या असतांना,फिर्यादी हे घाई-घाईने हॉस्पीटल मध्ये गेल्यानंतर,यातील नमुद अनोळखी इसमाने फिर्यादीचे आईजवळ येऊन त्यांना पोलीस असल्याची बतावणी करून,त्यांचे गळयातील सोन्याची चेन ही पर्समध्ये ठेवण्यास लावुन,त्यांची पर्स घडी करण्याच्या बहाण्याने स्वतः जवळ घेऊन,त्यातील सोन्याची चेन फिर्यादी यांचे आईची नजर चुकवुन हातचलाखीने काढुन घेवुन,रिकामी पर्स त्यांना परत देऊन फसवणुक केली आहे. (फिर्यादी व त्यांची आई घरच्या लोकांशी चर्चा करून तक्रार दिल्याने नोंद केली आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. चाऊस ८८८८९७४३४३ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**